# नियमित दिवाणी दावा क्र.२७/२०२१ मधील नि. ८१ खालील आदेश

प्रतिवादी क्र.२ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचेविरुध्द झालेला विनाकैफियत व निशाणी ५ वर म्हणणे नाही चा आदेश रद्द होऊन दाव्याकामी कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी केलेला आहे.

(२) वादी यांनी सदरचा दावा हा प्रतिवादींविरुध्द सरस निरस मानाने वाटप होवून पृथक कब्जा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जान्वये प्रतिवादी क्र. २ ने असे कथन केले आहे की, कैफियत देणेकरीता प्रतिवादीस आवश्यक ती कागदपत्रे व माहिती मिळू शकल्या नसल्याने यातील प्रतिवादीस वेळेत कैफियत व निशाणी ५ वर म्हणणे देता आले नाही. सबब सदरील प्रतिवादी क्र. २ विरुध्द झालेला विनाकैफियत व निशाणी ५ वरील म्हणणे नाही चा आदेश रद्द करणेचा आदेश व्हावा अशी विनंती त्यांनी सदर अर्जाद्वारे केली आहे.

(३) वादीतर्फे विद्वान विधीज्ञांनी प्रस्तुत अर्जावरच म्हणणे सादर करुन असे कथन केले आहे की, सदरील अर्ज व अर्जातील मजकूर मान्य व कबूल नाही. प्रतिवादीने जाणुनबुजून प्रस्तुत दाव्यास कैफियत व तुर्तातुर्त अर्जास म्हणणे दाखल केले नाही. सबब सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा. सदरचा अर्ज मंजूर करणेचा झालेस प्रतिवादीस दंड व्हावा अशी विनंती केलेली आहे.

(४) नि.८१ वरील अर्ज, त्यापुष्ट्यर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र व नि.८३ चे अर्जावरील म्हणणे यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे

विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी दाव्याचे कामी हजर होऊनदेखील वेळेत कैफियत व तुर्तातुर्त अर्जास म्हणणे दाखल करु शकलेले नाहीत. प्रतिवादीने कथन केले की, कैफियत देणेकरीता प्रतिवादीस आवश्यक ती कागदपत्रे व माहिती उपलब्ध होवू न शकल्याने यातील प्रतिवादीस वेळेत कैफियत व म्हणणे देता आले नाही. प्रस्तुत दावा हा सरस निरस मानाने वाटप होवून पृथक कब्जा मिळणेकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत प्रकरणांत प्रतिवादीस त्यांची बाजू मांडून दाव्याकामी या प्रतिवादीची कैफियत व तुर्तातुर्त अर्जास म्हणणे आल्यास दाव्याचे कामकाज पुढे चालून दावा गुणदोषावर निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे, दाव्याचे स्वरुप विचारात घेता व प्रतिवादीने केलेला विलंब विचारात घेता सदर अर्ज खर्चाच्या अटीवर मंजूर करणे न्यायोचित वाटते. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रतिवादी यांचा निशाणी ८१ वरील अर्ज र.रु.१०००/–
इतका खर्च वादींना देणेचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

विटा.
दि. १०.१२.२०२४.

**(श्रीमती अ. ब. सोनटक्के)**
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
विटा, जि.सांगली.